ePaper
| वर्ष - 7 | अंक -33 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दि. 30 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**कुरुलकरांना न्यायालयाचा दणका! न्यायालयीन कोठडीत वाढ**



## आतील पानांत

- पोटोबा महाराजांना महाभिषेक!
- पिंपरी-चिंचवड पालिका भरती परीक्षेत बनावट विद्यार्थी!
- शहरात गारांचा जोरदार पाऊस; झाडे उन्मळून पडली



# वाहतूक कोंडीवर स्मार्ट सिग्नल!

## हिंजवडीच्या चौकातील प्रयोग यशस्वी, वाहनधारकांसाठी होतोय फायदा...

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**हिंजवडीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सर्वाधिक गर्दीच्या विनोदे वस्ती चौकात आयुक्तालयातील पहिला स्मार्ट सिग्नल बसवण्यात आला. या सिग्नलला सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह सेन्सर असल्याने वाहनांच्या गर्दीवर सिग्नलचा वेळ ठरविण्यात येत आहे. त्यामुळे चौकातील वाहतूककोंडी काही प्रमाणात कमी होत असल्याचे चित्र आहे. शहरातील एका संगणक अभियंत्याने केलेला हा प्रयोग यशस्वी होत असून, लवकरच शहरभर स्मार्ट सिग्नल दिसण्याची शक्यता आहे.**

रावेत येथे राहणाऱ्या प्रशांत गिलबिले या संगणक अभियंत्याने हा सिग्नल बनवला असून, त्याचा पोलिसांकडून प्रायोगिक तत्त्वावर वापर सुरू आहे. गिलबिले यांच्या १६ जणांच्या टीमने वर्षभराच्या मेहनतीनंतर 'स्मार्ट सिग्नल'ची कल्पना सत्यात उतरवली. सुरुवातीला वाकड चौकात महिन्याचा प्रयोग राबविल्यानंतर हिंजवडीत एकेरी वाहतूक असणाऱ्या विनोदे वस्ती परिसरात हा सिग्नल बसवला.

### काय आहे स्मार्ट सिग्नल?

या सिग्नलला 'सीसीटीव्ही' कॅमेरा आणि सेन्सर असून, वाहनांच्या गर्दीवर सिग्नलची वेळ बदलते. गाड्यांची संख्या मोजून सिग्नल बदलला जातो. सिग्नलवर एकही गाडी नसल्यास तो पडत नाही. विशेष म्हणजे रुग्णवाहिका, सायरन अथवा दिव्याची गाडी आल्यास सिग्नल हिरवा होतो आणि ते वाहन गेल्यास पुन्हा पूर्ववत होतो. चौकात चोहोबाजूने गर्दी झाल्यास गाड्यांचा सरासरी वेळ लक्षात घेऊन सिग्नल बदलतो. 'ग्रीन कॉरिडॉर' किंवा 'व्हीआयपी मूव्हमेंट'ला सिग्नल आपोआप नियंत्रित होतो. गरज पडल्यास सिग्नल मानवी नियंत्रणातही हाताळता येतो.

### कशी सुचली कल्पना?

'आयटी' क्षेत्रात काम करणारे अभियंता प्रशांत गिलबिले रावेतला राहत असून, त्यांचे कार्यालय हिंजवडीत आहे. कामावरून घरी जात असताना त्यांना अनेकदा सिग्नल आणि ट्रॅफिकमध्ये अडकून पडावे लागत असे. अनेकदा गर्दी नसतानाही फक्त सिग्नलच्या अतिरिक्त वेळेमुळे वाहतूक कोंडी होऊन वेळ वाया जात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी 'स्मार्ट सिग्नल'वर काम करण्याचे ठरवले. १६ जणांची टीम घेऊन वर्षभर प्रयोग केल्यानंतर त्यांना यश आले. त्यानंतर त्यांनी तत्कालीन उपायुक्त आनंद भोईटे यांना 'स्मार्ट सिग्नल'चा प्रकल्प दाखवला. त्यानंतर वरिष्ठांच्या सूचनेनुसार पोलिस निरीक्षक सुनील पिंजण यांच्या मार्गदर्शनानुसार वाकड चौकात सिग्नल बसवण्यात आला. हा प्रयोग यशस्वी होत असल्याचे लक्षात येताच सहआयुक्त संजय शिंदे यांनी सिग्नल विनोदे चौकात बसवण्याच्या सूचना केल्या.

### कसा काम करतो स्मार्ट सिग्नल?

- सिग्नलला सीसीटीव्ही कॅमेरा सेन्सर आहे.
- वाहनांच्या गर्दीवर सिग्नलची वेळ बदलते.
- गाड्यांची संख्या मोजून, वेळ बदलली जाते.
- सिग्नलवर एकही गाडी नसल्यास सिग्नल पडतच नाही.
- रुग्णवाहिका, सायरन अथवा दिव्याची गाडी आल्यास सिग्नल हिरवा होतो व ते वाहन गेल्यास पुन्हा पूर्ववत होतो.
- चौकात गर्दी : गाड्यांचा सरासरी वेळ लक्षात घेऊन सिग्नल बदलतो.
- ग्रीन कॉरिडॉर किंवा व्हीआयपी मूव्हमेंटला सिग्नल आपोआप सेट होतो.
- अपघात किंवा एखादी दुर्घटना, नियम मोडणाऱ्या वाहनांची माहिती जाहीर करतो.

# आमदार सुनील शेळके यांच्यावरील गुन्हे मागे होण्यासाठी

# पोटोबा महाराजांना महाभिषेक!

## किशोर आवारे यांच्या खूनाचा आरोप खोटा समर्थकांचा दावा...

। पुणे ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जनसेवा विकास समितीचे अध्यक्ष किशोर आवारे यांची तळेगाव मध्ये मागील दिवसात हत्या करण्यात आली होती. यानंतर आवारे यांच्या आईने तळेगांव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली, यामध्ये त्यांनी मावळ तालुक्याचे आमदार सुनील शेळके यांचे हात असल्याचा आरोप केला होता. यामुळे या प्रकरणामध्ये आमदार शेळके यांचे नाव चर्चेत आले होते.**





आमदार शेळकेंवर आरोप झाल्यानंतर आता त्यांच्या समर्थकांकडून ग्रामदैवत श्री पोटोबा महाराजांना मोरया महाअभिषेक करण्यात आले होते. शेळके यांचे समर्थकांचा दावा आहे की, त्यांच्यावर खोटे आरोप झाले आहेत. समर्थकांनी या आरोपाचा खंडन करत आमदारांवर आलेलं संकट दूर करण्यासाठी मोरया प्रतिष्ठानच्या वतीने काल वडगांव मावळचे ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज यांना मोरया महाअभिषेकाचे आयोजन करण्यात आले होते.

यात शेळके यांच्यावरील गुन्हे मागे होऊन त्यांच्यावरील संकट दूर व्हावे यासाठी महाअभिषेक करून पोटोबा चरणी साकडं घालण्यात आले. तसेच मावळातील राजकीय दूषित वातावरण दूर करून सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदावे ही प्रार्थना करण्यात आली.

### काय आहे प्रकरण ?

तळेगाव दाभाडे येथे नगरपरिषद कार्यालयासमोर दि. १२ मे रोजी भर दुपारी जनसेवा विकास समितीचे प्रवर्तक किशोर गंगाराम आवारे (वय ५०) यांची चार हल्लेखोरांनी निर्घृण हत्या केली. जमिनीच्या वादातून किंवा राजकीय वैमनस्यातून हत्या झाल्याचा संशय आहे. या खून प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके, त्यांचे बंधू सुधाकर शेळके यांच्यासह सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आमदार सुनील शेळके यांनी किशोर आवारेंचा खून केल्याचा आरोप आवारेंच्या आईने केला आहे.

त्यामुळे खळबळ उडाली आहे. याप्रकरणी आवारे यांच्या आई माजी नगराध्यक्षा सुलोचना आवारे यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके, सुधाकर शेळके, संदीप गराडे, श्याम निगडकर यांच्यासह अन्य तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

---

## लग्नास नकार दिला म्हणून प्रियकराने प्रेयसीच्या बहिणीला पाठवले न्यूड फोटो

। पिंपरी। महाईन्यूज ।

चिंचवडमध्ये लग्नास नकार देणाऱ्या प्रेयसीचे न्यूड फोटो तिच्या बहिणीला पाठवून बदनामी करणाऱ्या प्रियकराच्या विरोधात दिघी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहित कांतीलाल भोसले असे आरोपी प्रियकराचे नाव आहे. पीडित आणि आरोपी दोघे एकत्र राहायचे त्यांचे एकमेकांवर प्रेम होते. रोहित प्रेयसीकडे लग्नासाठी तगादा लावत होता. या कारणावरून त्यांच्यात भांडण होऊन विभक्त झाले. अशी माहिती दिघी पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रेयसीने सोबत राहण्यास नकार दिल्यावरून तिचे न्यूड फोटो तिच्या बहिणीला पाठवणाऱ्या प्रियकराच्या विरोधात प्रेयसीने दिघी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. याप्रकरणी विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रियकर अद्याप फरार आहे. त्याचा शोध दिघी पोलीस घेत आहेत. प्रियकर रोहित आणि पीडित प्रेयसी एकत्र राहायचे. परंतु,



रोहित हा प्रेयसीला लग्नासाठी तगादा लावत होता. यालाच कंटाळून प्रेयसी त्याच्यापासून विभक्त झाली. प्रेयसीने पुन्हा एकत्र राहण्यास नकार दिला.

प्रियकर रोहित मात्र प्रेयसी पुन्हा सोबत राहावी यासाठी तिचा पाठलाग करत होता. तिला शिवीगाळ करायचा, काही वेळा प्रेयसीला मारहाण केल्याचे देखील पोलिस तक्रारीत म्हटल आहे. अखेर प्रेयसीची बदनामी करण्याच्या उद्देशाने तिचे न्यूड फोटो तिच्या बहिणीच्या व्हाट्सअप नंबर वर पाठवले, असा उल्लेख तक्रारीत आहे. त्यानंतर मात्र प्रेयसीने रविवारी दिघी पोलिस ठाणे गाठत तक्रार दिली आहे. आरोपी प्रियकर रोहित चा शोध पोलीस घेत आहेत.

## पुण्यात गौतमी पाटीलच्या कार्यक्रमापूर्वी तुफान राडा, पण पावसाचा... कार्यक्रम करावा लागला स्थगित

### खेड तालुक्यातील मोई येथे गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाचे आयोजन

। खेड । महाईन्यूज

**प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील ही तिच्या कार्यक्रमात होणाऱ्या राड्या वरून नेहमीच चर्चेत असते. आता देखील ती तिचा कार्यक्रम सुरू होण्या अगोदर पावसाने तुफान राडा घातला आहे. त्यामुळे आयोजकांना आजचा कार्यक्रम उद्यावर ढकलावा लागला. त्यामुळे आजचा कार्यक्रम ठरलेल्या वेळेत याच ठिकाणी होणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. पिंपरी खेडचे आमदार दिलीप मोहिते यांच्या वाढदिवसानिमित्त खेड तालुक्यातील मोई येथे प्रसिद्ध लावणी डान्सर गौतमी पाटील हिचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पण या कार्यक्रमाअगोदर पावसाने हजेरी लावली.**



खेडचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त खेड तालुक्यातील मोई येथे गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र कार्यक्रमाच्या काही तास आधी पावसाने या भागात जोरदार हजेरी लावली. आणि कार्यक्रम ठिकाणी सर्व राडा झाल्याचे पाहायला मिळाले.

गौतमी पाटील ही सद्या तिच्या पाटील आडनाव लावण्यावरून चांगलीच चर्चेत आली आहे. अनेक मराठा संघटनांनी याला विरोध दर्शवला होता. मात्र माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी तीच्याबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे. कलाकार म्हणून गौतमी पाटील हिच्या पाठीशीही उभं राहिलं पाहिजे असं म्हणत गौतमी. पाटील हिला संभाजीराजे छत्रपती यांनी समर्थनच दिले आहे.

याबाबत माहिती देताना आयोजक समीर गवारे म्हणाले की, आमदार दिलीप मोहिते यांच्या वाढदिवसानिमित्त गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र पावसाने हजेरी लावल्याने आजचा कार्यक्रम स्थगित करण्यात आला असून उद्या ठरलेल्या वेळेत कार्यक्रम होणार आहे. पावसाने अचानक राडा केल्याने कार्यक्रम स्थगित करावा लागला असल्याचे गवारे यांनी सांगितले.

### गौतमीची तरुणांमध्ये क्रेझ

गौतमी पाटीलची तरुणाईमध्ये मोठी क्रेझ वाढत आहे. तिच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने तरुण हजेरी लावतात. अनेक व्हिडिओ देखील गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमाचे व्हायरल होत असतात. त्यामुळे तिला अनेक ठिकाणी मागणी असते.

# पिंपरी-चिंचवड पालिका भरती परीक्षेत बनावट विद्यार्थी!

## प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर, संभाजीनगरच्या 3 जणांविरुध्द गुन्हा

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या भरती परीक्षेत बनावट विद्यार्थी पेपर देताना आढळून आला. संबंधिताकडून प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर केला जात होता. छाननीत ही बाब उघड झाली. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील तीन जणांविरुध्द येथील उपनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या भरती परीक्षेत बनावट विद्यार्थी पेपर देताना आढळून आला. संबंधिताकडून प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर केला जात होता.**





याबाबत नाना मोरे (सदगुरूनगर,पुणे) यांनी तक्रार दिली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने नोकर भरती प्रक्रिया सुरू आहे. लिपीकसह अन्य पदांसाठी वेगवेगळ्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा होत आहे. नाशिक येथील तोफखाना केंद्र रस्त्यावरील जैन भवन भागातील फ्युचरटेक सोल्युशन येथे ही परीक्षा होती. या केंद्रात अर्जुन महेर हा परीक्षार्थी प्रतिबंधीत इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर करतांना आढळला. अधिक चौकशीत तो राहूल नागलोभ याच्या जागेवर बेकायदा परीक्षा देत असल्याचे उघड झाले.

प्रवेश पत्रावर बनावट स्वाक्षरी करून त्याने परीक्षा केद्रात प्रवेश मिळवला. त्याला संशयित अर्जुन राजपूतने परीक्षा केंद्रावर इलेक्ट्रॉनिक्स उपकरण दिल्याचे समोर आले. या प्रकरणी राहूल नागलोभ, अर्जुन महेर आणि अर्जुन राजपूत (सर्व हनुमान मंदिराजवळ, रामेश्वरवाडी, खेडगाव, छत्रपती संभाजीनगर) या तिघांविरुध्द उपनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीसह महाराष्ट्र विद्यापीठ मंडळ व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैर प्रकारास प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिघांपैकी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. अधिक तपास सहायक निरीक्षक चौधरी करीत आहेत.

---

# शहरात गारांचा जोरदार पाऊस; झाडे उन्मळून पडली

## धुवाँधार पावसाने बॅटींग केल्याने जनजीवन विस्कळीत, चाकरमान्यांची तारांबळ उडाली

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात सोमवारी (दि. 29) सायंकाळी विजांच्या कडकडाटासह गारांचा पाऊस पडला. धुवादार पावसाने बॅटींग केल्याने जनजीवन विस्कळीत झाले. अचानक आलेल्या पावसामुळे चाकरमान्यांची तारांबळ उडाली. सोमवारी सकाळी उन्हाचा कडाका जाणवला. दुपारी अचानक वातावरणात बदल झाला. ढग दाटून आले आणि अचानक पावसाला सुरुवात झाली. .**



पिंपरी (PIMPRI) -चिंचवड शहरात गारांचा पहिलाच पाऊस नागरिकानी अनुभवला. ठिकठिकाणी पाण्याचे तळे काही तासात साचले. त्यातच वाहतूक कोंडी झाल्याने वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागल्या. नोकर वर्गाची घरी जाताना धांदल उडाली. सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली. चाकरमानी कामावरून घरी जात असताना पाऊस आल्याने कामगारांनी दिसेल तिथे आडोसा घेतला. नाले पहिल्याच पावसात वाहू लागले. पावसात शहरवासियांचे चांगलेच हाल झाले. तर अनेकजण पावसाने सुखावले. चिमुकले घराबाहेर गारा जमा करताना दिसून आले.पुढील काही दिवस ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.



### जोरदार पावसात उन्मळून पडली झाडे

पिंपरी चिंचवड शहरात जोरदार पाऊस झाल्याने ठिकठिकाणी झाड पडीच्या घटना घडल्या आहेत. परिणामी रस्त्यावर वाहतूक कोंडी झाल्याने झाडे हटविण्याची कामे सुरू आहेत. तळवडे रस्त्यावर वादळ वाऱ्यामुळे झाडे पडले असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. तसेच, सेक्टर 22 या ठिकणी पोलीस चौकी या ठिकाणी देखील एक झाड पडले आहे. निगडी स्मशानभूमी रस्ता, निगडी श्रीकृष्ण मंदिर, कैलासवासी मधुकर पवळे क्रीडांगण या ठिकाणी झाड पडले आहेत. अग्निशामक दल त्याचप्रमाणे वृक्ष प्राधिकरण अधिकारी यांच्याकडे तक्रारी करण्यात आले असल्याचे माजी नगरसेवक सचिन चिखले यांनी सांगितले.

# करिअरमधील 'मिक्स अँड मॅच'




कामाशी संबंधित नसलेल्या विषयाचा अभ्यास करण्यापेक्षा इंटर-रिलेटेड विषय/कोर्स नेहमीच फायदेशीर ठरतो. करिअरमधील याच 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्स विषयी जाणून घ्या...

एका विषयात पदवी शिक्षण घेतलेले दुसऱ्याच क्षेत्रात कार्यरत असलेल्याची अनेक उदाहरणे आहेत. जसे की, बीए (इतिहास), कम्प्युटर कोर्स केलेले एखाद्या कंपनीच्या एचआर विभागात कार्यरत आहेत किंवा प्राणीशास्त्रातील बीएससी पदवी आणि एखाद्या कंपनीच्या विपणन विभागात काम करतात. सध्या 'मिस अँड मॅच'चा ट्रेंड वाढताना दिसत आहे. पण या सगळ्यात एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे आपले दुर्लक्ष होते आहे, तो म्हणजे नोकरीच्या क्षेत्राशी पूर्णपणे किंवा अंशतः संबंधित कोर्सचा अभ्यास करण्यास काय हरकत आहे? लक्षात घ्या, इथे मी जॉब-ओरिन्टेड कोर्सबाबत बोलत नसून अशा 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्सेसबाबत बोलत आहे. यामुळे स्पर्धात्मक काळात दुसऱ्यांपेक्षा एक पाऊल पुढे राहण्यास मदत होईल. असे हे 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्स करण्याचे विविध फायदे समजून घेऊ या...

केवळ पदवीवर उत्तम नोकरी मिळवण्याचा काळ राहिलेला नाही. लक्षात घ्या, सध्याची वाढती लोकसंख्या बघता आणि स्वतःचे वर्चस्व, अस्तित्व टिकवण्यासाठी बऱ्याच कंपन्यांनी हायर अँड फायर या धोरणाचा स्वीकार केलेला आहे. अशा परिस्थितीत एकाच क्षेत्रात पारंगत असलेल्या व्यक्तींपेक्षा बहु-प्रतिभावान व्यक्ती टिकून राहण्याची शक्यता अधिक आहे. उदाहरणार्थ, सध्या कम्प्युटरचे ज्ञान हे अतिरिक्त शैक्षणिक पात्रता म्हणून पाहिले



जात नाही. पण कोणत्याही उद्योगात ती आवश्यक पात्रता आहे.

आधी नमूद केल्याप्रमाणे घेतलेले शिक्षण आणि त्या शिक्षणाचा संबंध नसलेल्या क्षेत्रात काम करण्यापेक्षा इंटर-रिलेटेड कोर्स हे यशस्वी कारकीर्द बनवण्याचा मार्ग नक्कीच सोपा करतात.इंटर-रिलेटेड कोर्सचा अजून एक फायदा म्हणजे एका विषयातील ज्ञानाचा उपयोग दुसऱ्या विषयात करता येतो. जसे की, भाषेवरील प्रभुत्व (उदाहरणार्थ, मराठी भाषा) आणि पत्रकारितेचा अभ्यासक्रम एकमेकांना पूरक आहे. कारण भाषेचा पाया मजबूत असल्यामुळे पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाशी जुळवून घेणे अधिक सोपे होते. अशा प्रकारे एका कोर्सचे ज्ञान दुसऱ्या कोर्सच्या कामकाजात सहजपणे लागू केले जाते.

'जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ वन' ही म्हण सगळ्यांच्या परिचयाची असेल. पण आजच्या अटीतटीच्या स्पर्धेत जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ वनची गरज अधिक आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सखोल ज्ञान असल्यामुळे वस्तुनिष्ठ विश्लेषण, योग्य नियोजन आणि उत्तम कामगिरी करण्याची शक्यता अजून वाढते. विषय, उद्योग, ग्राहकांचा कल याबाबत सखोल ज्ञान असल्यामुळे व्यावसायिक आणि वैयक्तिक पातळीवर भरभराट होण्यास मदत होतेच, पण त्याचबरोबर निष्काळजीपणा, तक्रारी, गैरजसमजदेखील कमी होण्यास मदत होते.

इंटर-रिलेटेड कोर्स केल्याचे संभाव्य फायदे आपण वरती पाहिलेच. याशिवाय अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अशा व्यक्तींना त्या क्षेत्रातील गुंतागुंतीच्या गोष्टी तसेच त्यांचे निराकरण करणे सहज जमते. हाच गुणधर्म त्यांना दुसऱ्यांपेक्षा 'भिन्न' आणि 'ज्ञात' बनवतो आणि याचा फायदा त्यांच्या करिअर कारकिर्दीत होतो.

केवळ ट्रेंडचा पाठपुरावा करून कोर्स करण्यापेक्षा तुमची बुद्धिमत्ता, रुची, कार्यक्षेत्र इत्यादींचा विचार करून अशा कोर्सची निवड करा. ज्याचा तुम्हाला दीर्घकाळ फायदा होईल, पण त्याचबरोबर कंपनीत किंवा उद्योगात तुमचे वेगळे स्थान निर्माण होण्यास मदत होईल.

## संपादकीय »

### धान्य-धन्यता!

***एका बाजूला यंदा होणारे अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन आणि दुसऱ्या बाजूला जगातील १२१ विकसनशील देशांच्या भूक निर्देशांकात १०१ वरून १०७व्या क्रमांकावर झालेली घसरण सावरण्याची चिंता, या दोन परस्परविरोधी गोष्टींचा अन्वयार्थ लावणे हे देशासमोरील सर्वात मोठे आव्हान ठरणार आहे.***

कागदोपत्री पुरेसे धान्य निर्माण झाले असले, तरी ते या देशातील प्रत्येक नागरिकाच्या पोटात जाऊ शकत नाही. या वस्तुस्थितीकडे जोवर धोरणकर्त्यांचे दुर्लक्ष होईल, तोवर हा विरोधाभास राहणार. देशात कोणत्या धान्याची नेमकी गरज किती असते, हे जाहीर करणे सरकारच्या कृषी खात्याला सहज शक्य आहे. ते होत नाही, त्यामुळे प्रत्येक शेतकरी आपापल्या हिशोबाने हव्या त्या शेतमालाला प्राधान्य देतो. त्यामुळे काही बाबतीत देश गरजेपेक्षा अधिक उत्पादन करतो, तर काही शेतमालाची मोठ्या प्रमाणावर आयात करणे भाग पडते. कृषी धोरण आखताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले न गेल्यामुळे ही स्थिती उद्भवते.

**भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७५ वर्षांनी राजधानी दिल्लीत विस्तृत, दिमाखदार आणि भारतीय संस्कृतीच्या अनेक खुणाल्यालेले नवे संसद भवन रविवारी खुले झाले. हा देशाच्या आणि आपल्या संसदीय लोकशाहीच्या वाटचालीतला एक अविस्मरणीय, मंगल प्रसंग होता आणि त्याकडे कोणताही पक्षीय अभिनिवेश न बाळगता राष्ट्रीय दृष्टीने पाहिले पाहिजे.**

## नवभारताचे तीर्थक्षेत्र

रविवारी झालेल्या या संपूर्ण कार्यक्रमावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छाया होती आणि संसदेत दाखविलेल्या दोन वृत्तपटांमध्येही मोदी ठळकपणे दिसत होते. या कार्यक्रमाला राष्ट्रपती तसेच उपराष्ट्रपती हे घटनात्मक पदावरील दोन मान्यवर हवे होते, ही विरोधकांची अपेक्षा चूक नव्हती. पंतप्रधानांनी ठरविले असते तर या संपूर्ण कार्यक्रमाची रचना तशी करता आली असती. मात्र, मग स्वत: पंतप्रधानांचे स्थान राज्यशिष्टाचारांच्या संकेतांप्रमाणे तिसरे राहिले असते.

सेंगोल या ऐतिहासिक राजदंडाची स्थापना लोकसभेच्या नव्या सभागृहात करण्यात आली. तो मानही राष्ट्रपतींना द्यावा लागला असता. अर्थात, या कार्यक्रमाला राष्ट्रपती किंवा उपराष्ट्रपती हजर असते तरी विरोधकांनी बहिष्कार घातला नसताच; असे काही नाही. त्यांनी काहीतरी वेगळे निमित्त किंवा कारण शोधले असते. 'ऑस्ट्रेलियात आपण भाषण केले तेव्हा सत्ताधारी व विरोधक मतभेद विसरून एकत्रित हजर होते,' असा चिमटा मोदी यांनी दौऱ्यावरून परतल्यानंतर काढला होता. तो योग्य होता. नव्या संसद भवनाचे उद्घाटन होत असताना बहिष्कार टाकून विरोधकांनी काय मिळविले? उद्या केंद्रात विरोधकांचे सरकार आले तर ते जुन्या संसद भवनात अधिवेशन घेणार आहे का? राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे सदस्य शरद पवार यांनी तर कार्यक्रम झाल्यावर 'मी या कार्यक्रमाला गेलो नाही, याचे समाधान वाटते. पंडित



नेहरू यांनी समाजाची जी कल्पना केली होती, त्याच्या उलटे आपण चाललो आहोत,' अशी टीका केली. मोदी यांनी सेंगोलचा स्वीकार करताना जो मंत्रोच्चार झाला आणि तमिळनाडूतील वैदिक विद्वानांनी जी हजेरी लावली, त्याकडे त्यांचा निर्देश असावा.

मात्र, भारतीय वैदिक परंपरा आणि वैज्ञानिक आधुनिकता यांच्यात वैर असायचे काहीच कारण नाही. त्या केवळ विश्वकल्याणाच्या प्रार्थना आहेत. ते काही जारणमारण विधी नाहीत. किंबहुना, 'प्राचीनतले प्राचीन असे उत्तम आणि आधुनिकातले आधुनिक असे उत्तम' आम्ही अंगिकारू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या विस्तृत भाषणात म्हणाले. ते उचितच होते. भारताची सेक्युलर परंपरा लक्षात घेऊन यावेळी नव्या संसद भवनात १२ धर्म आणि संप्रदायांच्या मंगल प्रार्थना झाल्या. त्याकडे दुर्लक्ष का करायचे?

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आपत्ती प्रतिसाद दल सज्ज करा!

## कोकणात विशेष खबरदारी: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विविध नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत असल्याने प्रत्येक विभागीय आयुक्तालयाच्या ठिकाणी राज्य आपत्ती प्रतिसाद दल नियुक्त करण्यात यावे आणि पालिकांनीही त्यांच्या स्तरावर बचाव पथके तयार करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. राज्य आपत्ती धोके व्यवस्थापन निधीचा प्रभावीपणे खर्च करावा आणि कोकणात आपत्ती सौम्यीकरणाची कामे त्वरित सुरु करण्यात यावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.**



शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक सोमवारी झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत राज्य आपत्ती धोके व्यवस्थापन निधीचा खर्च, कोकण आपत्ती सौम्यीकरणाची कामे, करोना आणि अन्य प्रसंगी करण्यात आलेल्या बचाव कार्याचा खर्च, ई पंचनामे, आपदा मित्र, ई सचेत प्रणाली आदी मुद्द्यांवर मदत व पुनर्वसन प्रधान सचिव असीम गुप्ता यांनी सादरीकरण केले.

शिंदे म्हणाले की, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) तुकडय़ा राज्यात प्रत्येक ठिकाणी आपत्तीच्या काळात वेळेत पोचू शकत नाहीत. त्यासाठी राज्यात सहाही महसुली विभागांमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद दले (एसडीआरएफ) नेमण्याची कार्यवाही व्हावी. सध्या एसडीआरएफच्या दोन तुकडय़ा धुळे आणि नागपूर येथे आहेत. ठाणे महानगरपालिकेने आपत्ती प्रतिसादासाठी दल तयार केले असून त्यांनी विशेषत: इमारत दुर्घटनामध्ये उत्तम काम केले आहे. ज्या ठिकाणी उंच इमारती आहेत आणि आपत्तींची शक्यता जास्त आहे, अशा ठिकाणी पालिकांनी आपत्ती बचाव दले तयार करावीत.

कोकणात वारंवार वेगवेगळय़ा नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते. राज्य मंत्रिमंडळाने यापूर्वीच ३२०० कोटी रुपयांचा निधी कोकणातील विविध आपत्ती निवारण कामे करण्यासाठी मंजूर केले आहेत. यामध्ये भूमिगत वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधील आसरे बांधणे, दरडी प्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय, वीज अटकाव यंत्रणा आदींचा समावेश आहे. यासंदर्भातील तांत्रिक कार्यवाही पूर्ण करुन ही कामे सुरु करावीत, अशा सूचना शिंदे यांनी दिल्या.

### करोना काळात अर्थसहाय्य

करोना उपाययोजना आणि मदतीसाठी आजपर्यंत एक हजार ९७४ कोटी खर्च झाला आहे. करोनाने मृत्यु झालेल्यांच्या वारसांसाठी एकूण एक हजार ३८ कोटी रुपये इतके अनुदान वाटप मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे. प्रत्येक मृतांच्या नातेवाईकास ५० हजार रुपये राज्य शासनाने देण्याचे निश्चित केले होते. अद्याप पाच हजार प्रकरणे प्रलंबित आहेत, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

### पंचनाम्यांसाठी नवीन तंत्रज्ञान

पंचनाम्यांच्या पद्धतीत सुधारणा करून मोबाईल ॲपद्वारे पंचनामे करावेत. यासाठी एमआर एसएसी या कंपनीस नियुक्त केले आहे. यातून केल्या जाणाऱ्या ई - पंचनाम्यानुसार १५ दिवसांत बाधितांना नुकसानभरपाई मिळाली पाहिजे, अशी व्यवस्था तयार करण्याचे निर्देश शिंदे यांनी दिले. बैठकीस मुख्य सचिव मनोज सौनिक तसेच पोलीस महासंचालक रजनीश सेठ, विविध विभागांचे सचिव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# अन् दिल्ली हादरली!

## तरुणाविरोधात कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल

। नवी दिल्ली । महाईन्यूज

दिल्लीत एक धक्कादायक घटना घडली आहे. एका वादातून अल्पवयीन प्रेयसीवर चाकूने सपासप वार करून प्रियकराने खून केला आहे. साहिल असं आरोपी तरुणांचं नाव आहे. ही घटना शाहबाज परिसरात घडली असून, सीसीटीव्हीत कैद झाली आहे. पोलिसांनी आरोपी साहिलला बुलंदशहरमधून अटक केली आहे.




आलं. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली आहे.

### नेमकं प्रकरण काय?

दिल्लीतील जेजे कॉलनी येथे राहणाऱ्या १६ वर्षीय तरुणीचं आणि साहिलशी प्रेमसंबंध होते. रविवारी ( २८ मे ) रात्री अल्पवयीन तरुणी आपल्या मैत्रिणीच्या मुलाच्या वाढदिवसाला जात होती. तेव्हाच साहिलला तिने अडवलं. यावेळी दोघांमध्ये जोरदार वाद झाला. याच रागातून साहिलने तरुणीवर चाकूने सपासप २१ वार केले. त्यानंतर दगडाने तरुणीचं डोक ठेचण्यात

### दगडाने ठेचल्याने डोक...

आता १६ वर्षीय तरुणीचा शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. यात तरुणीच्या शरीरावर चाकूने १६ वार केल्याचं सांगितलं आहे. तसेच, दगडाने ठेचल्याने डोक फुटलं आहे. 'तरुणीच्या गळ्यावर चाकूचे ६ वार आहेत. तर पोटावर १० वार आहेत,' असं शवविच्छेदन अहवालात म्हटलं आहे. पोलीस पूर्ण शवविच्छेदन अहवालाची वाट पाहत आहेत.

# तुर्कस्तानमध्ये पुन्हा एर्दोगन यांच्याकडेच सत्ता

## दुसऱ्या फेरीतील निवडणुकीत 52 टक्के मते

। अंकारा । महाईन्यूज

**तुर्कस्तानचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगन यांनी अध्यक्षपदाची निवडणूक दुसऱ्या फेरीमध्ये जिंकत पुन्हा एकदा स्वत:कडेच सत्ता राखण्यात यश मिळवले. तुर्कस्तानात रविवारी दुसऱ्या फेरीसाठी झालेल्या मतदानात एर्दोगन यांना ५२ टक्के मते मिळाली. त्यामुळे आता ते पुढील पाच वर्षे राष्ट्राध्यक्ष राहणार आहेत. तुर्कस्तानचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगन यांनी अध्यक्षपदाची निवडणूक दुसऱ्या फेरीमध्ये जिंकत पुन्हा एकदा स्वत:कडेच सत्ता राखण्यात यश मिळवले.**



एर्दोगन यांच्या एकाधिकारशाहीकडे झुकणाऱ्या राजवटीला केमाल क्लुचदारोलो या सुधारणावादी नेत्याने आव्हान दिले होते. त्यांना सुमारे ४८ टक्के मते मिळाली. सलग २० वर्षे सत्तेवर असणाऱ्या एर्दोगन यांना यंदा सत्ता गमवावी लागेल असे चित्र होते. मात्र १४ मे रोजी झालेल्या पहिल्या फेरीत त्यांना ४९.५२ टक्के मते मिळाली होती, तर क्लुचदारोलो यांना ४४.८८ टक्के मते मिळाली होती. तिसऱ्या उमेदवाराने पाच टक्क्यांहून थोडी जास्त मिळवली होती. कोणालाही आवश्यक ५० टक्के मते न मिळाल्यामुळे दोन आठवडय़ांनी मतदानाची दुसरी फेरी पार पडली. त्यामध्ये एर्दोगन यांना नि:संशय बहुमत मिळाले. त्यानंतर त्यांनी देशवासीयांचे आभार मानले. या मतदानामध्ये जवळपास अडीच कोटी मतदारांनी भाग घेतला. एर्दोगन यांचे नेतृत्व मजबूत आणि निर्णायक असल्याच्या प्रतिमेचा त्यांना फायदा झाल्याचे सांगितले जात आहे. त्यांचे प्रतिस्पर्धी क्लुचदारोलो हे अधिक लोकशाहीवादी, पारंपरिक आर्थिक धोरणांचे पाठीराखे आणि पाश्चात्त्य देशांशी संबंध सुधारण्याच्या बाजूचे आहेत, तर एर्दोगन यांचे युरोप आणि पाश्चात्त्य देशांशी संबंध ताणलेले आहेत.

### पंतप्रधान मोदींकडून अभिनंदन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एर्दोगन यांचे पुन्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले. जागतिक मुद्दय़ांवरील दोन्ही देशांतील द्विपक्षीय संबंध यापुढेही बळकट होत राहतील असे ट्वीट त्यांनी केले.

# 'चोरटा पठाण! कार्टून फिल्मचं गाणं शाहरुखनं चोरलं...



बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खानच्या 'पठाण' चित्रपटाला ग्रहण लागल्याचं दिसतयं. किंग खानच्या आगामी 'पठाण' हा चित्रपट रिलीज होण्याआधीच नवनविन वाद तयार होत आहे. पठाण चित्रपटाच्या बेशरम रंग या पहिल्या गाण्यावरून सर्वत्र चांगलाच वाद तयार झाला तो वाद कमी होत नाही तोच या चित्रपटाचं दुसरं गाणं आलं. बेशरम रंग या गाण्यातील दीपिका पदुकोणच्या भगव्या रंगाच्या बिकिनीला विरोधकांनी मोठा मुद्दा बनवला आहे. तिच्या कपड्यांबाबतचं वाद कमी होतं नाही तोच त्याच्या चित्रपटाच्या दुसऱ्या गाण्यावरही आता चोरीचा आरोप करण्यात आला आहे.



चित्रपटातील दुसरं गाणं 'झूमे जो पठाण' काल रिलीज करण्यात आले आहे. सध्या ते यूट्यूबवर ते ट्रेंडिंगला आहे. या गाण्यात दीपिका आणि शाहरुखची अतिशय बोल्ड स्टाईल पाहायला मिळत होती. एकीकडे गाणं काही लोकांच्या पसंतीस पडत आहे. तर दुसरीकडे सोशल मीडियावर ट्विटरच्या प्रतिक्रियेबद्दल पाहिलं तर काही वेगळ चित्र पहायला मिळतंय. काही लोकांना हे गाणे आवडलेलं नाही.


गाण्यापेक्षा शाहरुख आणि दीपिकाला एकत्र पाहणं काही लोकांना आवडलं. पण आता या गाण्यावरही नवीन वाद होण्याची शक्यता आहे. आधीही या चित्रपटाच्या बेशरम रंग हे गाणं कॉपी केल्याचा आरोप सोशल मीडियावर करण्यात आला होता, त्यामुळे आता मेकर्सवर झूम जो पठाणची धूनही चोरल्याचा आरोप केला जात आहे.

मराठमोळ्या अभिनेत्री कायमच चर्चेत असतात. आपल्या अभिनयाने, लूकमुळे आणि फोटोशूटमुळे त्या कायमच चाहत्यांचे लक्ष वेधून घेत असतात. सध्या ख्रिसमस आणि न्यू इअरच्या निमिताने अनेक सेलिब्रेटी फिरण्यासाठी देशात परदेशात गेले आहेत. बिग बॉसमुळे चर्चेत आलेली अभिनेत्री रुचिरा जाधव हिने आपल्या सोशल मीडियावर फोटो शेअर केला आहे.

## मराठमोळ्या अभिनेत्रीचं सौंदर्य, ओळखलंत का?



छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध अभिनेत्री रुचिरा जाधव बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वामध्ये सहभागी झाली होती. बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यापासून रुचिरा ही सोशल मीडियावर चांगलीच सक्रीय झाली आहे. नुकतीच ती काश्मीरमध्ये फिरायला गेली असताना तिने फोटो शेअर केला आहे. फोटोत तिने पिवळ्या रंगाची साडी परिधान केली आहे. केस मोकळे सोडले आहेत. तिचा हा लूक पाहताच तिचे चाहते खुश झाले आहेत. बिग बॉस कार्यक्रमात ती आणखीन चर्चेत आली ती म्हणजे तिच्या बॉयफ्रेंड डॉ. रोहित शिंदेमुळे, या पर्वात दोघे सहभागी झाले होते. सुरुवातीला गोडीगुलाबीने वावरणाऱ्या या जोडीमध्ये हळूहळू मतभेद व्हायला लागले, सध्या त्या दोघांच्याही रिलेशनशिपमध्ये फूट पडली. रुचिराने त्याला



## तू हो म्हण तरच सोडेन.. सनी लिओनीकडे पाकिस्तानी चाहत्याची अजब मागणी..

पोर्नस्टार म्हणून जगभर ओळख असणारी आणि नंतर अभिनयातून बॉलीवुड मध्ये पदार्पण करणारी सनी लिओनी कायमच चर्चेत असते. ती सोशल मिडियावर प्रचंड सक्रिय असते. शिवाय तीचा पोर्न इंडस्ट्री मधील काम थांबवण्याचा निर्णय असो किंवा मूल दत्तक घेण्याचा.. तिच्या प्रत्येकच निर्णयाने तिचे चाहते खुश झाले आहेत. आज पुन्हा एकदा सनी चर्चेत आली आहे. त्याचे कारणही तसे खास आहे. एका पाकिस्तानी चाहत्याने तिच्याकडे अजब मागणी केली आहे. सोशल मिडियावरून केलेल्या मागणीची आणि सनीच्या उत्तराची सध्या बरीच चर्चा आहे.

सनी सोशल मीडियावर बरीच सक्रिय असते. ती कायमच सोशल मीडियावरुन चाहत्यांशी संवाद साधत असते. ती या आधी पोर्नस्टार असल्याने केवळ भारतातच नाही तर जगभरात तिचे चाहते आहेत. अशाच एका पाकिस्तानी चाहत्याने फेसबूक पोस्ट करत सनीकडे एक मागणी केली आहे. ए. एम. खाननं असं या चाहत्याचं नाव असून 'सनी लिओनीनं मला रिप्लाय दिला तरच मी सिगारेट सोडेन' असे त्याने पोस्टमध्ये म्हटले होते.विशेष म्हणजे अनेकदा मोठे सेलेब्रिटी अशा पोस्ट पाहून त्याकडे दुर्लक्ष करतात पण सनीने मात्र त्या चाहत्याला उत्तर दिले आहे. सनीने त्या चाहत्याच्या पोस्टवर कमेंट केली आहे. ती म्हणाली "...मग तू सिगारेट केव्हा सोडतो आहेस?" असा प्रश्न सनीनं त्याला रीप्लाय देत



सनीने उत्तर देताच त्या चाहत्यालाही मोठा धक्का बसला आहे. तिच्या या उत्तरानंतर त्या चाहत्यानेही तिला रीप्लाय दिला आहे. "आश्चर्यकारक...! धन्यवाद तू रीप्लाय दिल्याबद्दल.!!" असे त्याने म्हटले आहे.

## कंगनाने लता मंगेशकरांशी केली स्वत:ची तुलना

बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौत ही कायमच विविध कारणांमुळे चर्चेत असते. कधी बॉलिवूडवर निशाणा साधल्यामुळे तर कधी राजकीय घडामोडींवर भाष्य केल्यामुळे कंगना स्वतःकडे लक्ष वेधून घेत असते. आता कंगनाने लग्नात डान्स करण्यावरुन एक मोठं वक्तव्य केले आहे. यामुळे ती चर्चेत आली आहे.

कंगना ही इन्स्टाग्रामवर कायम सक्रीय असल्याचे पाहायला मिळते. नुकतंच कंगनाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात तिने प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत आशा भोसले या लता मंगेशकर यांच्या खासगी आयुष्यातील एक किस्सा सांगताना दिसत आहेत."लता मंगेशकर यांनी एका लग्नात गाणं गाण्यासाठी १ मिलियन डॉलरची ऑफर नाकारली होती. तुम्ही ५-१० मिनिटे तरी येऊन जा, असेही समोरची व्यक्ती दीदींना सांगत होती. पण त्यांनी स्पष्ट भाषेत नकार दिला. मला ५ मिलियन डॉलर दिले तरीही मी अशा ठिकाणी येणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले होते."हा व्हिडीओ शेअर करत कंगना म्हणाली, "मी या गोष्टीशी सहमत आहे. इतकंच नव्हे तर मी कधीही लग्न किंवा अशा खासगी पार्ट्यांमध्ये जाऊन डान्स केलेला नाही. माझ्याकडे इतकी लोकप्रिय गाणी असतानाही मी कधीही असे केलेले नाही. यातून मिळणारी मोठी रक्कम नाकारली. मी जेव्हा हा व्हिडीओ पाहिला तेव्हा मला फार आनंद झाला. लताजी खरंच खूप प्रेरणादायी आहेत."





कंगना सध्या तिच्या 'इमर्जन्सी चित्रपटावर काम करत आहे. या चित्रपटात ती पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत दिसणार आहे.

# रवींद्र जडेजा ठरला हिरो!

## » एम. एस. धोनीच्या नेतृत्त्वाखाली चेन्नईने पाचव्यांदा आयपीएल चषकावर कोरले नाव

। अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३च्या अंतिम फेरीत गतविजेत्या गुजरात टायटन्सचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी होत आहे. हा सामना रविवारीच होणार होता. मात्र, २८मे चा दिवस पावसाने वाहून गेला. आता हा सामना आज राखीव दिवशी खेळला गेला. सोमवारी चेन्नईचा कर्णधार धोनीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २० षटकांत ४ गडी गमावून २१४ धावा केल्या. यानंतर पावसामुळे डकवर्थ लुईस नियमानुसार चेन्नईला १५ षटकांत १७१ धावांचे लक्ष्य मिळाले. रवींद्र जडेजाने मोहित शर्माच्या शेवटच्या षटकातील दोन चेंडूंवर षटकार आणि चौकार मारत रोमहर्षक विजय मिळवला.**



गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्या दरम्यान झालेल्या या सामन्यात पावसाने मोठा व्यत्यय आणला. मात्र, रात्री उशिरापर्यंत झालेल्या या सामन्यात अखेर एमएस धोनी याच्या नेतृत्वातील चेन्नई सुपर किंग्जने विजय मिळवला. सीएसके आता आयपीएल इतिहासात पाच वेळा चॅम्पियन ठरणारा दुसरा संघ ठरला आहे. गुजरात टायटन्सला सलग दुसऱ्या आयपीएल हंगामात विजेतेपद आपल्याकडे राखता आले नाही. सीएसकेच्या आघाडीच्या फलंदाजांनी सुरुवातही दणक्यात करून दिली, परंतु गुजरातचे हुकमी एक्के नूर अहमद व मोहित शर्मा यांनी मॅच फिरवली होती. पण, धोनीला विक्रमी पाचवे जेतेपद जिंकून देण्यासाठी ते अपयशी ठरले. रवींद्र जडेजाने थरारक सामन्यात अखेरच्या दोन चेंडूंत १० धावा चोपून विजय मिळवून दिला.

नियोजित कार्यक्रमानुसार हा अंतिम सामना २८मे रोजी खेळला जाणार होता. मात्र, या दिवशी एकाही चेंडूचा खेळ झाला नाही. परिणामी सामना राखीव दिवशी म्हणजेच सोमवारी (२९मे) खेळवण्यात आला. चेन्नईचा कर्णधार एमएस धोनी याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. शुबमन गिल व ऋद्धिमान साहा या जोडीने संघाला पुन्हा एकदा अर्धशतकी सलामी दिली. गिलने ३९ तर साहाने ५४ धावांचे योगदान दिले. मात्र, गुजरातच्या डावाचा नायक युवा साई सुदर्शन हा ठरला. त्याने ४७ चेंडूवर ९६ धावांची शानदार खेळी केली. त्याच्या योगदानामुळे गुजरातने ४ बाद २१४ धावा केल्या.

या सामन्यात साई सुदर्शनने गुजरातकडून सर्वाधिक ९६ धावा केल्या. त्याचवेळी ऋद्धिमान साहाने ५४ धावांची खेळी केली. शुबमन गिलने ३९आणि हार्दिक पांड्याने नाबाद २१ धावा केल्या. चेन्नईचे सर्व गोलंदाज चांगलेच महागडे ठरले. पाथिरानाने दोन गडी बाद केले. चहर आणि जडेजा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. चेन्नईकडून कॉनवेने सर्वाधिक ४७ धावा केल्या, पण सर्व फलंदाजांनी चांगले योगदान दिले. गुजरातकडून मोहित शर्माने तीन आणि नूरने दोन विकेट घेतल्या. मोहित शर्माने शानदार गोलंदाजी करत चेन्नई संघाला दडपणाखाली आणले होते. शेवटच्या षटकात १३ धावांचा बचाव करताना त्याने पहिल्या चार चेंडूत फक्त तीन धावा दिल्या. यानंतर रवींद्र जडेजाने षटकार आणि चौकार मारून चेन्नईला पाचवे विजेतेपद मिळवून दिले. या सामन्यात धोनी पहिल्याच चेंडूवर बाद झाला.

### चेन्नईला पावसाचा फायदा

» पावसामुळे चेन्नई संघाला फायदा झाला. षटके कमी झाली आणि चेन्नईला १५ षटकांत १७१ धावांचे लक्ष्य होते. षटके कमी करून पाच झाली, पण धावगती फारशी वाढली नाही. चेन्नईच्या पूर्ण १० विकेट्स होत्या. अशा स्थितीत कॉनवे आणि ऋतुराज यांनी तुफानी सुरुवात केली. या दोघांनी मिळून चार षटकांच्या पॉवरप्लेमध्ये ५२ धावा जोडल्या. येथून चेन्नई संघ चांगल्या स्थितीत पोहोचला.

### रहाणे-रायडूने चेन्नईला सामन्यात आणले

» या सामन्यात चौथ्या षटकात अजिंक्य रहाणे फलंदाजीला आला, पण त्यामुळे त्याच्या फलंदाजीत काही फरक पडला नाही. पहिल्या चार चेंडूंत दोन षटकार मारून त्याने आवश्यक धावगती फारशी वाढू दिली नाही. पुढचे षटक नूरचे होते आणि त्याने ते काळजीपूर्वक खेळले. यानंतर राशिदच्या षटकात दोन चौकार मारत त्याने चेन्नईची धावसंख्या १०० धावांच्या पुढे नेली. सुरुवातीच्या ११ चेंडूत २६ धावा करत त्याने चेन्नई संघाला सामन्यात परत आणले. मोहित शर्माने त्याला बाद केले, पण त्यानंतर दुबेने लय पकडली आणि राशिदच्या स्पेलच्या शेवटच्या दोन चेंडूंवर दोन षटकार मारत चेन्नईला सामन्यात रोखले. त्याचवेळी रायुडूने आठ चेंडूंत १९ धावांची झंझावाती खेळी करत चेन्नईची स्थिती आणखी चांगली केली. रायुडूच्या खेळीचा परिणाम असा झाला की, सलग दोन चेंडूंत दोन विकेट्स गमावल्यानंतरही चेन्नईचा संघ सामन्यात कायम राहिला.

---

# थायलंड खुली बॅडमिंटन स्पर्धा : सिंधू, श्रीकांतच्या कामगिरीकडे लक्ष

। क्वालालंपूर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत समाधानकारक कामगिरी केल्यानंतर पीव्ही सिंधू आणि किदम्बी श्रीकांतसह भारतीय खेळाडूंचे लक्ष्य मंगळवारपासून सुरू होणाऱ्या थायलंड खुल्या बॅडमिटन (सुपर ५०० दर्जा) स्पर्धेत आपल्या खेळात सातत्य राखण्याचे असेल.**



मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत समाधानकारक कामगिरी केल्यानंतर पीव्ही सिंधू आणि किदम्बी श्रीकांतसह भारतीय खेळाडूंचे लक्ष्य मंगळवारपासून सुरू होणाऱ्या थायलंड खुल्या बॅडमिटन (सुपर ५०० दर्जा) स्पर्धेत आपल्या खेळात सातत्य राखण्याचे असेल. सिंधूने गेल्या आठवड्यात मलेशिया मास्टर्स बॅडमिटन स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली होती, तर श्रीकांतने उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली होती. या दोन्ही खेळाडूंचे लक्ष आता जेतेपद मिळवण्याकडे असेल. दोन ऑलिम्पिक पदकविजेती सिंधू माद्रिद स्पेन मास्टर्स स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचत जेतेपद मिळवण्याच्या जवळ होती. मात्र, तिला अपयश आले. श्रीकांत थॉमस चषकाच्या ऐतिहासिक विजयातही संघर्ष करताना दिसला. जागतिक क्रमवारीत दोन स्थानांच्या घसरणीसह १३व्या स्थानी पोहोचणारी सिंधू थायलंड स्पर्धेच्या पहिल्या फेरीत कॅनडाच्या मिशेल लीचा सामना करेल, तर श्रीकांतचा सामना मलेशिया मास्टर्सची अंतिम फेरी गाठणाऱ्या चीनच्या वेंग होंग यांगशी होईल. एचएस प्रणॉयने यांगला नमवत मलेशियन स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते.

# पॅरिस ऑलिम्पिकपर्यंत 'स्पिन सर्व्हिस'वर बंदीच!

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाने प्रचलित होणाऱ्या 'स्पिन सर्व्हिस'वरील बंदी पॅरिस ऑलिम्पिकपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाने सुदिरमन करंडक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर २९ मेपर्यंत अशा प्रकारच्या 'सर्व्हिस'वर तात्पुरती बंदी आणली होती. मात्र, सोमवारी झालेल्या संघटनेच्या बैठकीत पॅरिस ऑलिम्पिकपर्यंत ही बंदी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे आता मंगळवारपासून सुरू होणाऱ्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतही अशा 'सर्व्हिस'वर बंदी असेल.

"स्पिन सर्व्हिस'च्या वापराबद्दल सविस्तर चर्चा केल्यानंतर ही बंदी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे पॅरिस ऑलिम्पिक आणि पॅरा-ऑलिम्पिकवर याचा परिणाम होणार नाही. ऑलिम्पिक पात्रता फेरीतही या 'सर्व्हिस'च्या वापरावर निर्बंध असतील," असे आंतरराष्ट्रीय संघटनेने आपल्या निवेदनात म्हटले आहे. डेन्मार्कच्या मार्कस रिंडशोज या दुहेरीतील खेळाडूने अशा प्रकारची 'सर्व्हिस' प्रचलित आणली. अशा प्रकारची 'सर्व्हिस' करून प्रतिस्पर्धी खेळाडूस सहजपणे गोंधळात टाकून झटपट गुण वसूल करता येतात. अशी 'सर्व्हिस' करणे ही एक कला असून, अनेक खेळाडू ती झपाट्याने आत्मसात करत आहेत; पण अशी 'सर्व्हिस' अन्यायकारक आहे.